जाहीर सूचना

याद्वारे जनतेस जाहिर सूचना देत आहे की, माझे अशिल यांच्या सुचनेनुसार मी मे. कार्पोरेट स्टेशनरी प्रायव्हेट लिमिटेड (यापुढे यांस कंपनी असे संबोधले जाईल) यांची वर्णनाच्या मालमत्तेची सर्व बिनशेती जमिनी जुना सर्वे नं. 157 (भाग) (नवीन सर्वे नं. 22/3), जुना सर्वे नं. 158/अ/1 (भाग) (नवीन सर्वे नं. 93/1अ) आणि जुना सर्वे नं. 158/1(भाग) (नवीन सर्वे नं. 93/1ब), 7/12 उताऱ्याप्रमाणे 38,640 चौरस मीटर या मोठया मालमत्तेपैकी सामुदायिक क्षेत्र 25,250.53 चौरस मीटर, मोठया वर्णनाची मालमत्तेपैकी गॅनसन लिमिटेड आणि बी.आर.टी. लिमिटेड यांना भाडेपट्टयावर दिलेल्या जमिनीचे सामुदायिक मालमत्ता क्षेत्र 13,389.47 चौ.मीटर वगळता मौजे ढोकाली, तालुका आणि जिल्हा ठाणे याची पडताळणी केली आहे. मे. कार्पोरेट स्टेशनरी प्रायव्हेट लिमिटेड हे सदर मालमत्ता गहाण ठेवू इच्छित आहे. (यापुढे यांस एकत्रितपणे जमीनी असे संबोधिले जाईल) जर कोणाही व्यक्तीचे, संस्थेचे, कंपनीचे, बॅंकेचे, वित्तीय संस्थेचे अथवा कोणाचेही दान, गहाण, तारण, लिन, लिज, भाडेपट्टा, वारसाहक्क, मृत्युपत्र, ताबा, वहिवाट, अगर खरेदी अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, बोजा व हरकत अगर तक्रार असल्यास हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून 7 दिवसांच्या आत खालील दिलेल्या वकीलांच्या पत्त्यावर योग्य त्या कागदपत्रासहीत आणि पुराव्याच्या नोटरीच्या प्रमाणित प्रतीसहीत लेखी तक्रार नोंदवावी. मुदतीत हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकतीबाबत कोणतेही कोणाचेही हक्क नाहीत व सदरची मिळकत पुर्णपणे निर्वेध असे ग्राहय धरुन अथवा कोणाचे हक्क, हितसंबंध असल्यास ते त्यांनी जाणीवपुर्वक सोडून दिलेले आहेत असे समजण्यात येईल आणि आम्ही सदर कंपनीला कोणतीही नोटीस किंवा संदर्भ न देता कंपनीचे शीर्षक प्रमाणित करीन.

दिनांक : 12.06.2021
स्थळ : नवी मुंबई

सही/–
एम. पी. सुनिल
वकील, उच्च न्यायालय
कार्यालय–318, शिव सेंटर,
सेक्टर 17, वाशी, नवी मुंबई.

FUTURISTIC SECURITIES LIMITED

CIN : L65990MH1971PLC015137
Regd. Off. : 202, Ashford Chambers, Lady Jamshedji Road, Mahim (West), Mumbai-400 016
Tel. : 022 24476800, Fax : 022 24476999
Email : futuristicsecuritieslimited@yahoo.in
Website : www.futuristicsecurities.com

NOTICE

Pursuant to Regulation 47 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 that a meeting of Board of Directors of the Company will be held on Tuesday, June 29, 2021 at the registered office of the Company, inter alia to consider and approve the Audited Financial Results of the Company for the quarter and year ended March 31, 2021.

BY ORDER OF THE BOARD
FOR **FUTURISTIC SECURITIES LIMITED**
SD/-
PRADEEP JATWALA
DIRECTOR
DIN : 00053991

Place : Mumbai
Date : June 11, 2021

मुथुट होमफिन (इंडिया) लि.

Muthoot Finance

कॉर्पोरेट कार्यालय: १२०१ आणि १२०२, १२ वा मजला, 'ए' विंग, लोटस कॉर्पोरेट पार्क, वेस्टर्न एक्स्प्रेस हायवे लगत, गोरेगाव (पूर्व), मुंबई– ४०००६३.

कब्जा सूचना

(जोडपत्र IV सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रुल्स, २००२ च्या नियम ८(१) नुसार)

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकारांनी मुथुट होमफिन (इंडिया) लि. (एमएचआयएल) चे प्राधिकृत अधिकारी म्हणून सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेटस् अॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ अन्वये आणि कलम १३(२) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२ च्या नियम ३ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून सदर सूचना प्राप्त झाल्याच्या तारखेपासून ६० दिवसात सूचनेत नमूद केलेली रक्कम चुकती करण्यासाठी येथील खालील नमुद कर्जदार/हमीदारांना कंपनीच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी मागणी सूचना जारी केली होती. कर्जदारांनी रक्कम चुकती करण्यास कसूर केली आहे म्हणून कर्जदार/सहकर्जदार/हमीदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना याद्वारे देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी सदर अॅक्टच्या कलम १३(४) सहवाचता सदर नियमावलीच्या नियम ८ अन्वये त्यांना प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून येथील खालील वर्णिलेल्या मिळकतीचा सांकेतिक कब्जा घेतला आहे. विशेषत: कर्जदार आणि वरील नमुद अन्य आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सावधान करण्यात येते की, त्यांनी सदर मिळकतीसह व्यवहार करू नये आणि मिळकतीसह केलेला कोणताही व्यवहार हा खालील नमुद रकमेसह त्यावरील व्याज या रकमेकरिता मुथुट होमफिन (इंडिया) लि. च्या प्रभाराच्या अधिन राहील.

अ. क्र.	अर्जदार, सह–अर्जदाराचे नाव	तारण मत्तचे संक्षिप्त वर्णन	कलम १३(२) सूचना तारीख आणि सूचना रक्कम अक्षरी	सांकेतिक कब्जाची तारीख
१	श्री. सुरेश रामचंद्र परब (कर्जदार) सौ. रश्मी सुरेश परब (सह–कर्जदार) (एलसी क्र. ००२–०००००५६७ मुंबई शाखा)	फ्लॅट क्र. १०१, १ ला मजला, बिल्डिंग क्र. १३०, समृध्दी एव्हरग्रीन्स, फेज–I, गट क्र. ४(२), ५, ७, ८, १०, प्राईम वॉटर कंपनीसमोर, कल्याण कर्जत रोड, गाव सापे, बदलापूर (पूर्व), ठाणे–महाराष्ट्र– ४२१५०३. उप प्रबंधक उल्हासनगर–२ यांच्या कार्यालयातील दिनांक ३० मे, १६ रोजीच्या विक्री विलेख नोंदणी क्र. ५२९२–२०१६ मध्ये अधिक विशेषत: नमुद.	२५–मार्च–२०२१ रु. १६४६५२६/– (रुपये सोळा लाख शेहेचाळीस हजार पाचशे सव्वीस मात्र)	०९–०६–२०२१
२	श्री. आशिष रमेश प्रभु (कर्जदार) सौ. लीना आशिष प्रभु (सह–कर्जदार) (एलसी क्र. ००२–००००६९५ (एलसी क्र. ००२–००००६९६ मुंबई शाखा)	फ्लॅट क्र. १०२, १ ला मजला, बी- विंग, मुक्ती सागर सीएचएसएल, पांचाळ नगर, नालासोपारा पश्चिम, ठाणे, महाराष्ट्र– ४२१२०३. उप प्रबंधक वसई ४ यांच्या कार्यालयातील दिनांक ११ जुलै, १३ रोजीच्या नोंदणीकृत विक्री विलेख नोंदणी क्र. ३५५८–२०१३ मध्ये अधिक विशेषत: नमुद.	२५–मार्च–२०२१ रु. १३,२४,५९३/– (रुपये तेरा लाख चोवीस हजार पाचशे त्र्याण्णव मात्र)	०७–०६–२०२१
३	श्री. सचिन राजाराम कदम (कर्जदार) श्री. नितिन राजाराम कदम (सह–कर्जदार) (एलसी क्र. ००२–००००८१६ मुंबई शाखा)	फ्लॅट क्र. १०५, १ ला मजला, द्वारका माई, बी विंग, चर्च रोड, चिंचपाडा, कल्याण – पू, ठाणे, महाराष्ट्र – ४२१३०६. उप प्रबंधक उल्हासनगर ३ यांच्या कार्यालयातील दिनांक २४ नोव्हे, १६ रोजीच्या नोंदणीकृत विक्री विलेख नोंदणी क्र. ११३६१–२०१६ मध्ये अधिक विशेषत: नमुद.	२५–मार्च–२०२१ रु. १२,९३,४००/– (रुपये बारा लाख त्र्यान्नव हजार चारशे मात्र)	०८–०६–२०२१
४	श्री. वसिम जफर खान (कर्जदार) श्री. जफर नाझिर खान (सह–कर्जदार) (एलसी क्र. ००२–००००११०८ मुंबई शाखा)	फ्लॅट क्र. ३०४, ३ रा मजला, नागेश्वर अपार्टमेंटस्, क्र. १७/४, आडिवली, ढोकली, कल्याण, महाराष्ट्र – ४०२५०९ उप प्रबंधक उल्हासनगर ३ यांच्या कार्यालयातील दिनांक १३ जाने, १७ रोजीच्या नोंदणीकृत विक्री विलेख नोंदणी क्र. ४४८–२०१७ मध्ये अधिक विशेषत: नमुद.	२५–मार्च–२०२१ रु. १६,०९,४१२/– (रुपये सोळा लाख नऊ हजार चारशे बारा मात्र)	०८–०६–२०२१
५	श्री. नवनाथ मुलरीधर सोनावणे (कर्जदार) सौ. वनिता नवनाथ सोनावणे (सह–कर्जदार) (एलसी क्र. ००२–००००१२०४ मुंबई शाखा)	फ्लॅट क्र. १०९, १ ला मजला, नागुबाई अपार्टमेंट, गाव – चिंचपाडा, ता. अंबरनाथ, जिल्हा – ठाणे, महाराष्ट्र – ४२१३०६. उप प्रबंधक उल्हासनगर ३ यांच्या कार्यालयातील दिनांक ०७ फेब्रु, १७ रोजीच्या नोंदणीकृत विक्री विलेख नोंदणी क्र. १२६१–२०१७ मध्ये अधिक विशेषत: नमुद.	२५–मार्च–२०२१ रु. ६,७०,६३६/– (रुपये सहा लाख सत्तर हजार सहाशे छत्तीस मात्र)	०८–०६–२०२१
६	श्री. राजेंद्र संपतराव बोलके (कर्जदार) सौ. राजश्री राजेंद्र बोलके (सह–कर्जदार) (एलसी क्र. ०३७–०००००१२७ ठाणे शाखा)	फ्लॅट क्र. १०३, १ ला मजला, विंग सी, ग्रीन लॉन्स, गाव – वांगणी, ता. अंबरनाथ, जिल्हा – ठाणे, महाराष्ट्र – ४२१५०३. उप प्रबंधक उल्हासनगर २ यांच्या कार्यालयातील दिनांक २३ मार्च, १७ रोजीच्या नोंदणीकृत विक्री विलेख नोंदणी क्र. ३०८९–२०१७ मध्ये अधिक विशेषत: नमुद.	२५–मार्च–२०२१ रु. ८,२८,२०६/– (रुपये आठ लाख अठ्ठावीस हजार दोनशे सहा मात्र)	०९–०६–२०२१
७	श्री. राहुलकुमार दीपचंद पाल (कर्जदार) शांतीदेवी दीपचंद पाल (सह–कर्जदार) (एलसी क्र. ०३७–०३७००३६७ ठाणे शाखा)	फ्लॅट क्र. ३०३, ३ रा मजला, ए विंग, मलंग रोड लगत, आदित्य सनराईज, कौशिक प्लाझा, विंग ई, सर्व्हे क्र. ३६, ८/ए, धारवली, महाराष्ट्र – ४२१३०७. उप प्रबंधक उल्हासनगर ३ यांच्या कार्यालयातील दिनांक २८ जून, १७ रोजीच्या नोंदणीकृत विक्री विलेख नोंदणी क्र. ६६४५–२०१७ मध्ये अधिक विशेषत: नमुद.	२५–मार्च–२०२१ रु. ९,३६,२६८/– (रुपये नऊ लाख छत्तीस हजार दोनशे अडुसष्ट मात्र)	०८–०६–२०२१
८	श्री. भरत चंद (कर्जदार) सौ. दुर्गादेवी भरत चंद (सह–कर्जदार) (एलसी क्र. ०३७–०३७००६६१ ठाणे शाखा)	फ्लॅट क्र. ४०३, ४ था मजला, आयकॉन प्लाझा, ए विंग, सर्व्हे क्र. १९/४जी, पिसावली, कल्याण, डोंबिवली, महाराष्ट्र – ४२१३०६. उप प्रबंधक कल्याण २ यांच्या कार्यालयातील दिनांक २० जून, १७ रोजीच्या नोंदणीकृत विक्री विलेख नोंदणी क्र. ७१५३–२०१७ मध्ये अधिक विशेषत: नमुद.	२५–मार्च–२०२१ रु. १०,५७,३९१/– (रुपये दहा लाख सत्तावन्न हजार तीनशे एक्यान्नव मात्र)	०८–०६–२०२१
९	श्री. बंकत देवराव कांबळे (कर्जदार) रुपाली रावसाहेब बामणे (सह–कर्जदार) (एलसी क्र. ०३७–०३७००९३२ ठाणे शाखा)	फ्लॅट क्र. २०३, २ रा मजला, ए विंग, गणेश कृपा अपार्टमेंट, ए विंग, घर क्र. ६५७, चंदरपाडा, नायगाव, महाराष्ट्र – ४२१३०७. उप प्रबंधक वसई २ यांच्या कार्यालयातील दिनांक ०९ नोव्हे, १७ रोजीच्या नोंदणीकृत विक्री विलेख नोंदणी क्र. ९६०१–२०१७ मध्ये अधिक विशेषत: नमुद.	२५–मार्च–२०२१ रु. ८,२१,२९६/– (रुपये आठ लाख एकवीस हजार दोनशे शह्यान्नव मात्र)	०७–०६–२०२१
१०	श्री. सुनिल बाळु पानसरे (कर्जदार) सौ. सुनंदा सुनिल पानसरे (सह–कर्जदार) (एलसी क्र. ०३७–०३७०१११२ ठाणे शाखा)	फ्लॅट क्र.३०६, ए विंग, ३ रा मजला, राज सृष्टी, मोरेवाडी, डोने गाव रोड जवळ, वांगणी पश्चिम, महाराष्ट्र – ४२१५०३. उप प्रबंधक उल्हासनगर २ यांच्या कार्यालयातील दिनांक १७ मार्च २०१७ रोजीच्या नोंदणीकृत विक्री विलेख नोंदणी क्र. २७२७–२०१७ मध्ये अधिक विशेषत: नमुद.	२५–मार्च–२०२१ रु. ५,४७,५३८/– (रुपये पाच लाख सत्तेचाळीस हजार पाचशे अडतीस मात्र)	०९–०६–२०२१
११	श्री. अरुण पुंडलिक गावडे (कर्जदार) सुप्रिया राघो सावंत (सह–कर्जदार) (एलसी क्र. ०३७–०३७०१२११ ठाणे शाखा)	फ्लॅट क्र. १०४, १ ला मजला, बी विंग, श्री संकल्प रेसिडेन्सी, बी विंग, सर्व्हे क्र. ६४/९ ढोणे, उप प्रबंधक उल्हासनगर २ यांच्या कार्यालयातील दिनांक ०५ ऑगस्ट १७ रोजीच्या नोंदणीकृत विक्री विलेख नोंदणी क्र. १०४४०–२०१७ मध्ये अधिक विशेषत: नमुद.	२५–मार्च–२०२१ रु. ८,०२,१९०/– (रुपये आठ लाख दोन हजार एकशे नव्वद मात्र)	०९–०६–२०२१
१२	श्री. हसमुख एम. सोलंकी (कर्जदार) भारती आर. सोलंकी (सह–कर्जदार) श्री. करण हसमुख सोलंकी (२ रे सह–कर्जदार) (एलसी क्र. ०३७–०३७०१२१८ ठाणे शाखा)	फ्लॅट क्र. ३०७, ३ रा मजला, बाळाराम पाटील रेसिडेन्सी, सर्व्हे क्र. १६ए, घर क्र. ०८३३, आगरोळी गाव, आगरोळी बेलापूर, नवी मुंबई, ठाणे, महाराष्ट्र – ४००६१४. उप प्रबंधक ठाणे ८ यांच्या कार्यालयातील दिनांक १९ ऑगस्ट २०१७ रोजीच्या नोंदणीकृत विक्री विलेख नोंदणी क्र. ११४८३–२०१७ मध्ये अधिक विशेषत: नमुद.	२५–मार्च–२०२१ रु.१३,०५,९७०/– (रुपये तेरा लाख पाच हजार नऊशे सत्तर मात्र)	०९–०६–२०२१
१३	श्री. अमित सुरेश चंद्र अस्थाना (कर्जदार) सौ. विजय लक्ष्मी सुरेश चंद्र अस्थाना (सह–कर्जदार) (एलसी क्र. ०३७–०३७०१२४३ ठाणे शाखा)	फ्लॅट क्र. ३०८, ३ रा मजला, ए विंग, आनंतीबाई अपार्टमेंट, तलाव रोड, आर्या गुरुकुल स्कुलजवळ, नांदिवली, हाजी मलंग रोड समोर, कल्याण–पूर्व, महाराष्ट्र – ४२१३०१. उप प्रबंधक कल्याण ४ यांच्या कार्यालयातील दिनांक १५ नोव्हें २०१७ रोजीच्या नोंदणीकृत विक्री विलेख नोंदणी क्र. ११२८५–२०१७ मध्ये अधिक विशेषत: नमुद.	२५–मार्च–२०२१ रु. १२,६८,१७१/– (रुपये बारा लाख अडुसष्ट हजार एकशे एकाहत्तर मात्र)	०८–०६–२०२१
१४	श्री. सचिन शिवराम पेंढारी (कर्जदार) सौ. स्मिता सचिन पेंढारी (सह–कर्जदार) (एलसी क्र. ०३७–०३७०१३९७ ठाणे शाखा)	फ्लॅट क्र. ३०३, ३ रा मजला, ए विंग, वाफेकर प्लाझा, पुर्णा, भिवंडी, महाराष्ट्र – ४२१३०२. उप प्रबंधक भिवंडी २ यांच्या कार्यालयातील दिनांक १२ मार्च २०१८ रोजीच्या नोंदणीकृत विक्री विलेख नोंदणी क्र. १८३२–२०१८ मध्ये अधिक विशेषत: नमुद.	२५–मार्च–२०२१ रु.१५,२०,६२४/– (रुपये पंधरा लाख वीस हजार सहाशे चोवीस मात्र)	१०–०६–२०२१
१५	श्री. किशोर पांडु कलगुटकर (कर्जदार) सौ. सुप्रिया किशोर कलगुटकर (सह–कर्जदार) (एलसी क्र. ०३७–०३७०१४६५ ठाणे शाखा)	फ्लॅट क्र. २०२, ए विंग, २ रा मजला, गॅलेक्सी अपार्टमेंट, कोलखे पेठ पनवेल, महाराष्ट्र – ४१० २२१. उप प्रबंधक पनवेल १ यांच्या कार्यालयातील दिनांक १७ मार्च २०१८ रोजीच्या नोंदणीकृत विक्री विलेख नोंदणी क्र. २७१७–२०१८ मध्ये अधिक विशेषत: नमुद.	२५–मार्च–२०२१ रु. ४,३४,५४०/– (रुपये चार लाख चौतीस हजार पाचशे चाळीस मात्र)	०९–०६–२०२१
१६	श्री. मंगेश मधुकर परब (कर्जदार) श्री. महेश मधुकर परब (सह–कर्जदार) (एलसी क्र. ०३७–०३७०२४०१ ठाणे शाखा)	फ्लॅट क्र. १०४, १ ला मजला, बी विंग, माऊली अपार्टमेंट, सर्व्हे क्र. १६८, हिस्सा क्र. ९, मौजे–कोन, तालुका – भिवंडी, ठाणे, महाराष्ट्र – ४२१३०१. उप प्रबंधक भिवंडी १ यांच्या कार्यालयातील दिनांक २७ जून २०१८ रोजीच्या नोंदणीकृत विक्री विलेख नोंदणी क्र. ५१४३–२०१८ मध्ये अधिक विशेषत: नमुद.	२५–मार्च–२०२१ रु. ६,६०,७४२/– (रुपये सहा लाख साठ हजार सातशे बेचाळीस मात्र)	०८–०६–२०२१
१७	श्री. वेंकटरामन निगुमंता विंजुन (कर्जदार) पद्मावती निगुमंता विंजुन (सह–कर्जदार) (एलसी क्र. ०३८–०३८०००३५ नवी मुंबई शाखा)	फ्लॅट क्र. २१०, २ रा मजला, श्री कृपा हाईटस्, मजकुर, मिळकत क्र. २८९, ४६७ए, ४६७बी, २९०, ५०३ मौजे, तळोजे, पनवेल, रायगड, महाराष्ट्र – ४१० २०८. उप प्रबंधक पनवेल १ यांच्या कार्यालयातील दिनांक १७ ऑक्टो २०१७ रोजीच्या नोंदणीकृत विक्री विलेख नोंदणी क्र. ८५७६–२०१७ मध्ये अधिक विशेषत: नमुद.	२५–मार्च–२०२१ रु. ५,७१,३८७/– (रुपये पाच लाख एकाहत्तर हजार तीनशे सत्याऐंशी मात्र)	०९–०६–२०२१
१८	श्री. बाळासो बबन चव्हाण (कर्जदार) सौ. सुजाता बाळासो चव्हाण (सह–कर्जदार) (एलसी क्र. ०३८–०३८००१३३ नवी मुंबई शाखा)	फ्लॅट क्र. २०४, २ रा मजला, ई–विंग, ग्रीन पार्क, देरावली, महाराष्ट्र – ४००७०३. उप प्रबंधक पनवेल १. एच यांच्या कार्यालयातील दिनांक २२ ऑगस्ट २०१७ रोजीच्या नोंदणीकृत विक्री विलेख नोंदणी क्र. ६९२८–२०१७ मध्ये अधिक विशेषत: नमुद.	२५–मार्च–२०२१ रु. ९,८७,०५४/– (रुपये नऊ लाख सत्याऐंशी हजार चौपन्न मात्र)	०९–०६–२०२१

कर्जदारांचे लक्ष तारण मत्ता विमोचनासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात अॅक्टच्या कलम १३ च्या पोटकलम (८) च्या तरतुदींकडे वेधण्यात येत आहे.

सही/–
ठिकाण : मुंबई **प्राधिकृत अधिकारी**
दिनांक : १२.०६.२०२१ **मुथुट होमफिन (इंडिया) लि. करिता**

SBI State Bank of India

शाखा: स्ट्रेस्ड अॅसेटस् रिझोल्युशन ग्रुप कमर्शिअल ब्रांच – III

प्राधिकृत अधिकाऱ्यांचा तपशील
नाव : विक्रांत सक्सेना
ई–मेल आयडी : vikrant.saxena@sbi.co.in
मोबाईल क्र. ७३७९४३३३३५
लॅन्डलाईन क्र. (कार्यालय) – ०२२–२२०२१२९६
पर्यायी मोबाईल क्र. ७०७३९१२७७७

पत्ता : स्टेट बॅंक ऑफ इंडिया, एसएआरजीसी II ब्रांच शाखा, ११२–११५, पहिला मजला, प्लॉट क्र. २१२, पश्चिम विंग, तुलसियानी चेंबर्स, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई – ४०००२१
फॅक्स क्र. : ०२२–२२८११४०१

जोडपत्र – IV – ए [नियम ८(६) ची परंतुके पहा]

स्थावर मिळकतीच्या विक्रीकरिता विक्री सूचना

सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेटस् अॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२ च्या नियम ८(६) च्या परंतुकान्वये स्थावर मिळकतीच्या विक्रीकरिता ई–लिलाव विक्री सूचना.

सर्वसामान्य जनता आणि विशेषत: कर्जदार आणि हमीदार यांना सूचना याद्वारे देण्यात येते की, खालील वर्णिलेली स्थावर मिळकत तारण धनकोंकडे गहाण/प्रभारित आहे, जिचा प्रत्यक्ष कब्जा स्टेट बॅंक ऑफ इंडिया, तारण धनकोंच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे ती **मे. श्री अधिकारी ब्रदर्स टेलिव्हिजन नेटवर्क लि. (कर्जदार) आणि मे. विश्वदीप प्रोजेक्ट्स प्रा. लिमिटेड (हमीदार)** यांचेकडून तारण धनकोंना **थकीत रु. ४७,१७,११,०९७.६३** + त्यावरील तारखेपर्यंत २८.०९.२०१७ पासून त्यावरील तारखेपर्यंत संविदात्मक दराने व्याज + खर्च आणि परिव्यय (वजा रोख वसुली काही असल्यास) च्या वसुलीकरिता **२९ जून, २०२१** रोजी ''जे आहे जेथे आहे'' ''जे आहे जसे आहे'' आणि ''जे काही आहे तेथे आहे'' तत्त्वाने विकण्यात येणार आहे.

मिळकतीची राखीव किंमत खालीलप्रमाणे:–

नामाधिकार विलेख धारकाचे नाव	मिळकतीचे वर्णन	राखीव किंमत (रु. करोडमध्ये)	इसारा अनामत रक्कम (इअर)
मे. विश्वदीप प्रोजेक्ट्स प्रा. लिमिटेड	एकत्रित कार्यालय क्र. ए–१००१, ए–१००२, ए–१००३, ए–१००४, ए–१००५, ए–१००६, ए–१००७, ए–१००८, बी–१००१, बी–१००२, बी–१००३, बी–१००४, बी–१००५ येथे १० वा मजला, फेअरलिंक सेंटर, सेवादास प्रिमायसेस, प्लॉट क्र. बी–६४, अंधेरी लिंक रोड लगत, अंधेरी पश्चिम, मुंबई– ४०००५३ (प्रत्येकी संचामध्ये विक्री)	८.२४	८२,४०,०००.००

ई–लिलावाची तारीख आणि वेळ	**दिनांक : २९.०६.२०२१, वेळ** : ६० मिनिटे स. ११.०० ते दु. १२.०० सह प्रत्येकी १० मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह.
बोली वाढविण्याची रक्कम	**रु. १,००,०००/–** आणि रु. एक लाखाच्या पटीत
इअर आणि सहभागी होण्यासाठी विनंतीपत्र/ केवायसी दस्तावेज/पुरावे सादर करण्याची तारीख आणि वेळ	ई–लिलाव सुरु होण्याआधी २९.०६.२०२१ रोजी किंवा पूर्वी
मिळकतीच्या निरिक्षणाची तारीख आणि वेळ	२४.०६.२०२१ स. ११.३० ते सायं. ४.००
संपर्क व्यक्ती/संपर्क क्रमांक	श्री. विक्रांत सक्सेना, मोबाईल ७३७९४३३३३५ श्री. ललित कुमार गुप्ता, मोबा. ७०७३९१२७७७

सदर प्रकाशन हे सर्व संबंधित पक्षकारांना ई–लिलावाकरिता १५ दिवसांची पूर्व सूचना म्हणून सुद्धा बजावणी आहे.

विक्रीच्या तपशिलवार अटी आणि शर्तीकरिता कृपया स्टेट बॅंक ऑफ इंडिया, तारण धनकोंची वेबसाईट **www.sbi.co.in** आणि **https://www.mstcecommerce.com/auctionhome/ibapi/index.jsp** मध्ये दिलेल्या लिंकचा संदर्भ घ्यावा.

सही/–
दिनांक : १२.०६.२०२१ **प्राधिकृत अधिकारी**
ठिकाण : मुंबई **स्टेट बॅंक ऑफ इंडिया**

The spirit of Mumbai is now 93 years old!
FREE PRESS
www.freepressjournal.in

जाहीर सूचना

आमचे अशील एसव्हीसी को–ऑपरेटिव्ह बॅंक लिमिटेड **(एसव्हीसी)** यांच्या वतीने याद्वारे सर्व लोकांना जाहीरपणे सूचित करण्यात येते की आम्ही खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या मालमत्तेचा **(सदर मालमत्ता)** व मेसर्स सीमा प्रॉपर्टीज अॅंड बिल्डर्स एलएलपी **(विकासक)** यांचा सदर मिळकतीवरील मालकी व अधिकाराचा व सदर मालमत्तेच्या नामाधिकाराचा तपास संपत्तीवर सर्वस्वी व विशेष प्रभार संपादन करण्यासाठी करीत आहोत.

सदर संपत्तिच्या संदर्भात (एफएसआय किंवा सिक्युरीटीमधील इतर कोणत्याही अधिकारासह) कोणत्याही व्यक्ती, हिंदू अविभाज्य कुटुंब, कंपनी, बॅंका, वित्तीय संस्था, नॉन–बॅंकिंग वित्तीय संस्था, विधीसंस्थापित किंवा अविधीसंस्थापित व्यक्तींची संस्था किंवा व्यक्तींचा संघ, सावकार आणि/किंवा धनको आणि/किंवा इतर कोणाचाही सदर मालमत्ता किंवा त्याच्या भागासंदर्भात कुठल्याही प्रकारचे अधिकार, मालकीहक्क, हितसंबंध, मागणी इत्यादी असल्यास किंवा विक्री, अदलाबदल, गहाण, प्रभार, शेअर, भेट, ट्रस्ट, परवाना, देखभाल, वारसा, कब्जा, ताबा, भाडेपट्टा, पोट–भाडेपट्टा, धारणाधिकार, बोजा, प्रवेश, भाडेकरूता, मालकी हमी, अभिहस्तांकन, हस्तांतरण, वहिवाटिचा हक्क, ,जप्ती, उत्तराधिकार, करार, कंत्राट, समझो त्याचे ज्ञापण, सुविधाधिकार, भागीदारी, वाटाघाटी, कौटुंबिक व्यवस्था, निर्वाह, कायद्याच्या कोणत्याही न्यायालयाचा आदेश किंवा हुकूम, प्रलंबित वाद, आरक्षण, विकासाचे हक्क, एफएसआय कंजम्पशन किंवा कोणत्याही प्रकारचे देय किंवा कमिटमेंट किंवा मागणी असल्यास सदर संपत्तिच्या संदर्भात तिने / त्याने / त्यांनी या सूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या कालावधीत खाली सही करणार यांचेकडे सर्व आधारभूत वैध / परिणामकारक मूळ दस्तावेजांसह प्रस्तुत करावा व त्या संदर्भात खात्री पटवून द्यावी, अन्यथा कोणाचेही कोणतेही हक्क, दावे किंवा निर्बंध नसल्याचे गृहित धरले जाईल आणि जरी काही हक्क, दावे किंवा निर्बंध असेलही तर असे मानण्यात येईल कि त्या व्यक्तिने पूर्णपणे त्याचा त्याग केला आहे आणि विकासकांद्वारे गहाण प्रक्रिया पूर्ण केली जाईल आणि एसव्हीसीद्वारे मान्य केली जाईल.

सदर संपत्तिचे परिशिष्ट

१) गाव घाटकोपर, तालुका कुर्ला, मुंबई उपनगर जिल्हा, पंतनगर, घाटकोपर (पू), मुंबई – ४०००७५, महाराष्ट्र, येथे स्थित मोजमापित क्षेत्र ८१२.१६ चौरस मीटर व अधिक क्षेत्र ७.९६ चौरस मीटर, जुना सर्व्हे क्रमांक २३६(अ), सध्याचा सी.टी.एस. क्रमांक ५६८१ असलेल्या जमिनीच्या **(सदर जमीन)** भाडेपट्टयाच्या हक्कांचे, आणि त्यावर बांधल्या जाणाऱ्या प्रोजेक्ट **सीमा राजधानी (प्रोजेक्ट)** मधील न विकलेले व एकूण रेरा चटई क्षेत्र २७७०८ चौरस फीट असलेले ३८ विक्री घटकांचे (पंतनगर राजधानी को–ऑप. हौसिंग सोसायटी लिमिटेडच्या जुन्या बिल्डिंग क्रमांक १४ च्या ३० सदस्यांसाठी राखीव ठेवलेले ३० फ्लॅट्स व सोसायटीकडे गहाण ठेवलेले ३ फ्लॅट्स वगळून), तसेच सदर जमिनीवरील विद्यमान आणि भविष्यात केल्या जाणाऱ्या बांधकामाचे गहाणाद्वारे विशेष तारण.

२) वरील सोसायटीच्या दिनांक ०४.१२.२०२० रोजीच्या डेव्हलपमेंट अग्रीमेंट (नोंदणी क्रमांक करल–१–१०६७४–२०२०) तसेच त्यासंबंधित दिनांक ०४.१२.२०२० रोजीच्या मुखत्यार पत्र (नोंदणी क्रमांक करल–१–१०६७३–२०२०) अन्वये विकासक यांना लाभलेले सदर जमीन व प्रोजेक्टमधील डेव्हलपमेंट राईट्सचे गहाणाद्वारे विशेष तारण.

सही/–
अॅडव्होकेट माधवी चौधरी
लेक्स विधान,
ई–९, रिद्धी एॅव्हेन्यू, ऑफ लिंक रोड, सत्व हॉटेल जवळ, चिकूवाडी, बोरिवली (प), मुंबई –४०००९२.
फोन : ९९२३३२७०७१
दिनांक : १२/०६/२०२१

MSEB HOLDING COMPANY LTD

Hongkong Bank Bldg. 4th Floor, M.G. Road, Fort, Mumbai- 400023
CIN:U40100MH2005153649
Phone No :- 22-22608383 Fax No-22619101

ई–निविदा सुचना

एमएसईबीएचसीएल/एमएसईडीसिएल (नियोक्ता) च्या वतीने कार्यकारी अभियंता (स्था.), स्थापत्य विभागातील बांद्रा अंतर्गत २०२१–२ साठी पात्र बोलीदाता एजन्सीज कडून सीलबंद निविदा **EEC/BND/TECH/T-25/2021-22 To T-27/2021-22** ला आमंत्रित करत आहेत. निविदा फक्त इलेक्ट्रॉनिक निविदा प्रणालीमधूनच प्रक्रिया केली जातील आणि एमएसईडीसीएलच्या कामकाजासाठी ई–निविदा प्रणालीवर नोंदणी केलेल्या विक्रेत्यांसाठी खुली असेल. बिड कागदपत्रे **१२.०६.२०२१ ते १७.०६.२०२१** वेळ २३.५५ पर्यंत वेबसाइटवर उपलब्ध होतील. निविदा सादर करण्याची शेवटची तारीख **१८.०६.२०२१** वेळ १४.३० पर्यंत आहे. शक्य असल्यास निविदा त्याच दिवशी १५.०० वाजता उघडली जातील. अधिक तपशीलासाठी आणि अद्यतनांसाठी आमच्या वेबसाइट www.mahadiscom.in ई–निविदा दुव्यास भेट द्या. एजन्सींना या आणि भविष्यातील ई–निविदा साठी स्वत: ची नोंदणी करण्याची विनंती केली जाते.

पी.आर.ओ. नं.–२७२/२०२१–२२

राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण समक्ष
खंडपीठ, येथे मुंबई
कंपनी योजना अर्ज क्र. ३०८५ सन २०१८
शी संबंधीत
कंपनी योजना याचिका क्र. १०५७ सन २०२०

कंपनी अधिनियम, २०१३ च्या बाबतीत;

आणि

कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम २३० ते २३२ आणि कंपनीज अॅक्ट, २०१३ च्या तरतुदीअनुसार प्रयोज्य तरतुदीच्या बाबतीत

आणि

मेगा मिलेनिअम ट्रेडिंग अॅण्ड इन्व्हेस्टमेंट प्रायव्हेट लिमिटेड (हस्तांतर कंपनी) सह इम्प्लेनिया सर्व्हिसेस अॅण्ड सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड (हस्तांतरक कंपनी) आणि त्यांचे संबंधित शेअरधारक यांच्या एकत्रिकरणाच्या योजनेच्या बाबतीत.

मेगा मिलेनिअम ट्रेडिंग अॅण्ड इन्व्हेस्टमेंट प्रायव्हेट लिमिटेड, **... पहिली अर्जदार कंपनी**
आणि
ईम्प्लेनिया सर्व्हिसेस अॅण्ड सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड, **...दुसरी अर्जदार कंपनी**

याचिकेची सूचना

याद्वारे सूचना घ्यावी की, मेगा मिलेनिअम ट्रेडिंग अॅण्ड इन्व्हेस्टमेंट प्रायव्हेट लिमिटेड (हस्तांतरक कंपनी) सह ईम्प्लेनिया सर्व्हिसेस अॅण्ड सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड (हस्तांतरीती कंपनी) आणि त्यांचे संबंधित शेअरधारक यांच्या एकत्रिकरणाच्या योजनेच्या मंजुरीकरिता याचिका. वरील उल्लेखित सदर याचिका सन्मा. राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण, मुंबई बेंच द्वारे कंपनी अधिनियम, २०१३ च्या २३० ते कलम २३२ अन्वये याचिका ३१ मे, २०२१ रोजी दाखल केली आणि २९ जून, २०२१ रोजी कंपनी प्रकरणे हाताळणाऱ्या सन्माननीय सभासदांसमक्ष सुनावणीकरिता निश्चित करण्यात आली. जर तुम्ही सदर याचिकेला विरोध करण्यास इच्छुक असाल तर याचिकेच्या सुनावणी करिता निश्चित केलेल्या तारखेपूर्वी किमान दोन दिवस अगोदर याचिकाकर्त्यांच्या वकिलांकडे तुमच्या किंवा तुमच्या वकिलांद्वारे सही केलेली हेतूची सूचना पाठवू शकता सह विरोधाची पार्श्वभूमी किंवा शपथपत्राची प्रत अशा सूचनेसोबत पाठवावी. याचिकाकर्त्यांच्या वकिलांकडून याचिकेची एक प्रत ती पाहिजे असलेल्या कोणत्याही व्यक्तीस त्यासाठीचे विहित शुल्क भरल्यावर पुरवण्यात येईल.

१२ जून, २०२१ दिनांकीत

सही/–
चंद्रकांत म्हाडेश्वर
याचिकाकर्ता कंपनीकरीता वकील
१/५, महावीर चेंबर्स, १ ला मजला, बानाजी पाथ, मनुभाई लेन फोर्ट द्वारे, मुंबई ४०० ००१

नि. क्र.११८

रजि. ए/डी/दस्ती/चिटकविणे/ढोल वाजवणे आणि
प्रकाशन/डीआरटीचा सूचना फलक

विक्री उद्घोषणा

वसुली अधिकारी–I यांचे कार्यालय
कर्ज वसुली न्यायाधिकरण–II, मुंबई

एमटीएनएल भवन, ३ रा मजला, स्ट्रॅण्ड रोड, अपोलो बंदर, बधवार पार्क, कुलाबा मार्केट, कुलाबा, मुंबई–४००००५.

आर. पी. क्र. १८३/२०१२ **दिनांक : ०८.०६.२०२१**

रिकव्हरी ऑफ डेबटस् ड्यु टू बॅंक अॅण्ड फायनान्शियल इन्स्टिट्युशन्स अॅक्ट, १९९३ सहवाचता आयकर अधिनियम, १९६१ च्या दुसऱ्या परिशिष्टाच्या नियम ३८, ५२(२) अन्वये विक्रीची उद्घोषणा

कॅनरा बॅंक (सिंडिकेट बॅंक), लॅमिंगटन रोड शाखा ..... प्रमाणपत्र धारक
विरुध्द
मे. शोमॅन इंटरनॅशनल आणि अन्य ....प्रमाणपत्र कर्जदार

प्रक . १ : मे. शोमॅन इंटरनॅशनल, प्रोप्रायटरी संस्था, तर्फे तीचे प्रोप्रायटर, श्री. मोहम्मद फसीहुद्दीन, ऑफिस नं. ९८/९९, २रा मजला, ओशिवरा लिंक प्लाझा कॉम्प्लेक्स, ओशिवरा, जोगेश्वरी (पश्चिम), मुंबई–४०० १०२. **आणि येथेही**: फ्लॅट क्र. १०४, एल २सी, ओकलॅंड पार्क, यमुना नगर, लोखंडवाला कॉम्प्लेक्स, अंधेरी (पश्चिम), मुंबई–४०० ०५३.
प्रक . २ : श्री. सलीम अहमद खान, बी–४०४, हिल्टन अपार्टमेंट, शास्त्री नगर, अंधेरी (पश्चिम), मुंबई–४०० ०५३.

ज्याअर्थी सन्माननीय पीठासिन अधिकारी, कर्ज वसुली न्यायाधिकरण क्र. II, मुंबई यांनी प्रमाणपत्र कर्जदारांकडून व्याज व खर्चासह **रु. १,६६,५१,३५४.१६** च्या वसुलीसाठी **मूळ अर्ज क्र. २६९/२०११** मध्ये वसुली प्रमाणपत्र काढले आणि वसुली प्रमाणपत्र/हुकूमाप्रमाणे **रु. ५,४०,०९,३७४.२९** ची रक्कम पुढील व्याज आणि प्रभारासह एकत्रित वसुलीयोग्य आहे.

आणि ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकारांनी सदर प्रमाणपत्राच्या पूर्ततेसाठी खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत विकण्याचे आदेश दिले.

आणि ज्याअर्थी **प्र. क. कडून रु. ५,४०,०९,३७४.२९ (रुपये पाच कोटी चाळीस लाख नऊ हजार तीनशे चौऱ्यात्तर आणि पैसे एकोणतीस मात्र)** सह दंड आणि वसुली आणि/किंवा प्रदानापर्यंत अर्ज दाखल झाल्याची तारीख पासून प्र.व. **१२% दराने पुढील व्याज** ही रक्कम थकीत आहे.

याद्वारे सूचना देण्यात येते की, जर पुढे ढकलण्याचा कोणताही आदेश नसल्यास, सदर मिळकत **१६.०७.२०२१ रोजी दु. ०२.०० ते दु. ०३.००** दरम्यान (आवश्यक असल्यास बंद होण्यापूर्वी शेवटच्या ५ मिनिटात बोली केल्यास आपोआप विस्तार खंडासह) **ई–लिलावाने विकली जाईल आणि बोली मे. सी–१ इंडिया प्रा. लि. प्लॉट क्र. ३०१, उद्योग विहार, फेज–२, गल्फ पेट्रोकेम बिल्डिंग, बिल्डिंग क्र. ३०१, गुरगाव, हरयाणा, पिन–१२२०१५ यांच्या वेबसाईटमार्फत ''ऑनलाईन इलेक्ट्रॉनिक बोली'' मार्फत करण्यात येईल. हेल्पलाईन नं. +९१–१२४–४३०२०२०/२१/२२/२३/२४. संपर्क व्यक्ती– (i) श्री. हरीश गोवडा, मोबाईल क्र. +९१ ९५९४५९७५५५ ई–मेल: hareesh.gowda@c1india.com आणि (ii) श्री. जय सिंग, मोबाईल +९१ ७७३८८६६३२६, ई–मेल: jay.singh@c1india.com.**

पुढील तपशिलांसाठी संपर्क : **श्री. प्रदीप पद्मन, चिफ मॅनेजर, मोबाईल क्र. ०७६३९२३६६७०.**

खालील परिशिष्टात वर्णन केल्याप्रमाणे उपरिनामित **प्रतिवादीं क्र. १** च्या मिळकतीची विक्री आणि सदर मिळकतीशी निगडित दायित्वे आणि दावे, जो पर्यंत ते सुनिश्चित केले आहेत, ते प्रत्येक संचासमोर परिशिष्टात विनिर्दिष्ट केले आहेत.

परिशिष्टात विनिर्दिष्ट केलेल्या संचांमधील विक्रीसाठी मिळकत ठेवली जाईल. जर, मिळकतीच्या एखाद्या हिश्श्याच्या विक्रीतून रोकड झालेल्या रकमेतून देणे भागले तर, उर्वरित बाबतीत विक्री ताबडतोब थांबवली जाईल. जर, विक्री घेणाऱ्या अधिकाऱ्यांकडे सदर प्रमाणपत्रातील थकबाकी, व्याज, खर्च (विक्रीच्या खर्चासह) कोणत्याही संचाच्या विक्रीआधी जमा केली किंवा त्यांना पटेल असे प्रमाणपत्रातील रक्कम, व्याज व खर्च निम्नस्वाक्षरीकारांकडे प्रदान केल्याचे पुरावे सादर केले तर ती विक्री देखील थांबविण्यात येईल.

विक्रीशी संबंधित कोणतीही कृती करणारे कोणतेही अधिकारी किंवा अन्य व्यक्ती थेट किंवा अप्रत्यक्षपणे विकावयाच्या मिळकतीसाठी बोली, संपादन किंवा कोणतेही हितसंबंध संपादित करू शकणार नाहीत. विक्री आयकर अधिनियम, १९६१ च्या दुसऱ्या परिशिष्टात विहित अटी आणि त्याअंतर्गतचे नियम आणि खालील शर्तींच्या अधीन होईल.

जोडलेल्या परिशिष्टातील विनिर्दिष्ट तपशील हे निम्नस्वाक्षरीकारांच्या सर्वोत्तम माहितीप्रमाणे दिले आहेत, परंतु ह्या उद्घोषणेमधील कोणत्याही त्रुटी, गैर–विधाने किंवा उणिवांसाठी निम्नस्वाक्षरीकार उत्तर देण्यास बांधील नसतील.

१. ज्या खाली मिळकत विकली जाणार नाही ती राखीव किंमत **रु. १,३३,५०,०००/– (रुपये एक कोटी तेहतीस लाख पन्नास हजार मात्र)**
२. ज्या रकमेने बोली वाढवायची ती **रु.१,००,०००/– (रुपये एक लाख मात्र)** बोलीच्या रकमेवरून किंवा बोलीदारांवरून कोणताही वाद झाला तर संच पुन्हा विक्रीस ठेवला जाईल.
३. सर्वोच्च बोलीदारांना तेव्हाच कोणत्याही संचाचे खरेदीदार म्हणून घोषित केले जाईल. हे सर्वस्वी निम्नस्वाक्षरीकारांच्या मर्जीवर अवलंबून असेल की, जेव्हा सरळ सरळ दिसते आहे की, देऊ केलेली किंमत अपुरी आहे तेव्हा ती करणे अव्यवहार्य आहे अशा वेळी सर्वोच्च बोली नाकारायची/स्वीकारायची.
४. तमाम जनतेकडून याद्वारे सदर ई–लिलावात बोली मागविण्यात येत आहेत. ऑनलाईन प्रस्तावासह **इअर रक्कम रु. १४,००,०००/–(रुपये चौदा लाख मात्र)** ही आरटीजीएस/एनईएफटीने मुंबई येथे देय वसुली अधिकारी, डीआरटी–II च्या **खाते क्र. ३००४३२५३८९०**, स्टेट बॅंक ऑफ इंडिया, फोर्ट मार्केट शाखा, मुंबई आयएफएससी कोड नं. **SBIN0005347** येथे जमा करावी. इअरची रक्कम व. का. नं. **१८३ सन २०१२** मधील वसुली अधिकारी, डीआरटी–II, मुंबईच्या नावातील डीडी/पे ऑर्डरने देखील जमा करता येईल. ऑनलाईन प्रस्तावासह टॅन/पॅन कार्ड व पत्त्याच्या पुराव्याच्या साक्षांकित छायाप्रती अपलोड करव्यात. एकापेक्षा जास्त मिळकतीसाठीचे प्रस्ताव वेगवेगळे करावेत. इअर आणि अन्य माहिती/तपशिलांसह ऑनलाईन प्रस्ताव सादर करण्यासाठी अंतिम तारीख आहे **१३.०७.२०२१ रोजी सं. ४.३० पर्यंत.** मिळकतींचे प्रत्यक्ष निरीक्षण प्रत्यक्ष ठिकाणी **०९.०७.२०२१ रोजी स. १०.०० आणि सं. ५.००** मध्ये करता येईल.
५. पॅन कार्ड, पत्ता पुरावा व ओळख पुरावा, ई–मेल आयडी, मोबाईल क्र. ची प्रत व जर ते स्वत:च्या वतीने किंवा त्यांच्या मुख्यांच्या वतीने बोली लावत असतील तर, नंतरच्या बाबतीत त्यांनी, त्यांची प्राधिकृती जमा केली पाहिजे, कसूर केली तर बोली फेटाळली जाईल. कंपनीच्या बाबतीत कंपनीच्या संचालक मंडळ सदस्यांनी पारित केलेल्या ठरावाची प्रत किंवा कंपनीच्या प्रतिनिधीत्व/मुखत्यारपणाची पुष्टी करणारा अन्य दस्तावेज सादर करून अशा जमा करण्याची पावती/प्रती पोच सदर सेवा पुरवठादार किंवा प्र.धा. बॅंकेकडे ई–मेल किंवा अन्य प्रकारे सदर तारखेपर्यंत पोहोचले पाहिजे आणि त्याची हार्ड कॉपी **१३.०७.२०२१ रोजी सं. ४.३० पर्यंत** वसुली अधिकारी–II, डीआरटी–II, मुंबईकडे सादर करावी.
६. यशस्वी बोलीदारांना इ.अ.र. समायोजित करून त्यांच्या **अंतिम बोली रकमेची २५% रक्कम** पुढील दिवशी **सं. ४.३०** पर्यंत वरील परि.–४ प्रमाणे सदर खात्यात भरावी लागेल.
७. खरेदीदारांनी अंतिम बोली रकमेची **७५% उर्वरित रक्कम** मिळकतीच्या विक्रीच्या तारखेपासून **१५ व्या दिवशी किंवा त्यापूर्वी, जर १५ वा दिवस रविवार किंवा अन्य सुट्टीचा दिवस** असेल तर १५ व्या दिवसानंतर पहिल्या बॅंकेच्या कार्यालयीन कामाच्या दिवशी वरील परिच्छेद ४ मध्ये दिलेल्या पद्धतीने प्रदान करावी. वरील व्यतिरिक्त, खरेदीदारांना **रजिस्ट्रार, डीआरटी–II, मुंबईच्या नावातील डीडीमार्फत रु. १,०००/– च्या रकमेपेक्षा जास्त १% दराने व रु. १,०००/– पर्यंत २% दराने वसुली अधिकारी–II, डीआरटी–II यांच्याकडे पाऊंडेज फी** देखील जमा करावी लागेल.

विहित मुदतीत प्रदानात कसूर केल्यास, विक्री खर्च बाजूला केल्यावर जमा रक्कम निम्नस्वाक्षरीकारांना वाटल्यास सरकारकडे जप्त केली जाईल आणि कसूरदार खरेदीदारांना मिळकतीमधील किंवा नंतर ती ज्या रकमेस विकली जाईल त्यातील कोणत्याही हिश्श्यामधील दावे त्यागावे लागतील. विक्रीची नव्याने उद्घोषणा जारी करून मिळकतीची पुनर्विक्री केली जाईल. पुढे खरेदीदाराने अंतिम बोली किंमत आणि त्यानंतर विकली जाईल ती किंमत यामध्ये फरक असल्यास तो भरून देणे बंधनकारक आहे.
लिलाव समाप्तीस अयशस्वी बोलीदारांना इ.अ.र. चा परतावा केवळ संबंधित बॅंकेकडून अशा बोलीदारांनी कळविलेल्या खाते क्रमांकातच केला जाईल.
मिळकत **''जसे आहे जेथे आहे तत्त्वाने'' आणि ''जे आहे जसे आहे तत्त्वाने''** विकली जाईल.
कोणतेही कारण न देता अवास्तव वाटलेल्या सर्व किंवा कोणत्याही बोली स्वीकारणे किंवा फेटाळणे किंवा कोणत्याही समयी लिलाव पुढे ढकलण्याचे अधिकार निम्नस्वाक्षरीकारांनी राखून ठेवलेले आहेत.

परिशिष्ट

संच क्र.	जेथे मिळकत कसूरवार व्यक्तीच्या मालकीची असेल तेथे सह–मालकांच्या व सह–मालक म्हणून अन्य कोणत्याही व्यक्तीच्या नावांसह विकावयाच्या मिळकतीचे वर्णन	मिळकत किंवा तिच्या कोणत्याही हिश्श्यावर निर्धारित महसूल	मिळकत ज्यास बांधील आहे अशा अन्य कोणत्याही भारांचे तपशील	मिळकतीवर करण्यात आलेले कोणतेही दावे आणि त्यांच्या स्वरुप व मूल्याबाबत अन्य कोणतेही ज्ञात तपशील
१	२	३	४	५
१.	प्लॉट क्र. २६ए, सीटीएस क्र. १/८६, गाव–ओशिवरा, तालुका अंधेरी, न्यु लिंक रोड, एक्स्टे., ओशिवरा पोलीस स्टेशन पुढे, ओशिवरा, जोगेश्वरी (पू.), मुंबई– ४०० १०२ येथील जमिनीच्या प्लॉटवर बांधलेल्या ओशिवरा लिंक प्लाझा, कमर्शियल प्रिमायसेस को–ऑप. सोसायटी लि. नावाच्या इमारतीच्या २ऱ्या मजल्ल वरील सुमारे ५६४.१५ चौ. फू. कार्पेट एरिया मोजमापित क्र. ९९ असलेली कार्यालयीन जागा सदर जागेतील जंगम सह.	उपलब्ध नाही	गहाण मिळकत	उपलब्ध नाही

माझ्या हस्ते आणि शिक्क्याने सदर ८ जून, २०२१ रोजी दिले.

शिक्का

सही/–
सुनिल के. मेश्राम
वसुली अधिकारी, डीआरटी–II, मुंबई